**ठळक बातम्या**

- गेल्या दहा वर्षांत देशाच्या कृषी उत्पादनात ४४ टक्के वाढ झाल्याची केंद्र सरकारची राज्यसभेत माहिती

- काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचं निधन

- आंध्र प्रदेशामध्ये बस अपघातात ९ जणांचा मृत्यू, तर २२ जण जखमी

**आणि**

- स्क्वॉश विश्वचषक २०२५ स्पर्धेत ब्राझीलवर दमदार विजय मिळवत भारताचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**<><><><><>**

गेल्या दहा वर्षांत देशाच्या कृषी उत्पादनात ४४ टक्के वाढ झाली असून, हा एक महत्त्वाचा टप्पा असल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी यांनी ही माहिती दिली. बियाण्याचं नवं वाण, आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतीच्या सुधारित पद्धतींचा वापर यामुळे हे शक्य झाल्याचं ते यावेळी म्हणाले. कृषी क्षेत्राचा व्यापक विस्तार करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभेत आज कार्तिगाई या दीपप्रज्वलनाच्या प्रथेवरून द्रमुक पक्षाच्या सदस्यांनी गदारोळ केल्यामुळे दुपारी दोन वाजेपर्यंत कामकाज तहकूब झालं. आज सकाळी कामकाज सुरु झाल्यावर सदनाच्या सदस्यांनी माजी लोकसभा अध्यक्ष शिवराज पाटील यांना आदरांजली वाहिली. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सभागृहाला शिवराज पाटील यांच्या निधनाची माहिती दिली. शिवराज पाटील यांनी महाराष्ट्राच्या लातूर संसदीय मतदारसंघातून सलग सात वेळा सभागृहाचे सदस्य म्हणून काम केलं. त्यांच्या कार्यकाळात उत्कृष्ट संसदपटू पुरस्कारांची सुरुवात झाल्याचं ते म्हणाले.

संसदेच्या दोन्ही सभागृहांनी आज १३ डिसेंबर २००१ रोजी संसदेवर झालेल्या हल्ल्यातल्या शहीदांना आदरांजली वाहिली. या हल्ल्याच्या वेळी संसदेच्या सतर्क सुरक्षा कर्मचाऱ्यांनी अदम्य साहस दाखवून दहशतवाद्यांचे मनसुबे उधळून लावल्याचं लोकसभेत, सभापती ओम बिर्ला म्हणाले. राज्यसभेत, अध्यक्ष सी पी राधाकृष्णन म्हणाले की, १३ डिसेंबर २००१ हा इतिहासातला एक काळा दिवस होता, या हल्ल्यात देशानं आपले वीर गमावल्याचं ते म्हणाले.

यानंतर प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात झाली. मात्र, कामकाज सुरू असताना द्रमुक पक्षाच्या सदस्यांनी गदारोळ केल्यामुळे कामकाज तहकूब झालं.

<><><><><>

औषधांची गुणवत्ता राखण्यासाठी भारत आणि दक्षिण आफ्रिकेतल्या लायबेरियानं सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. या करारामुळे सुरक्षित आणि परवडणाऱ्या औषधांची उपलब्धता वाढेल, असं आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. भारताचे लायबेरियातले राजदूत मनोज बिहारी वर्मा आणि लायबेरियाचे आरोग्य मंत्री डॉ. लुई एम. कपोटो यांनी या करारावर स्वाक्षरी केली.

<><><><><>

विधानसभेत आज कामकाजाची सुरुवात मंगळवारच्या कामकाजातल्या प्रलंबित राहिलेल्या अर्धा तास चर्चेच्या तासाने झाली. राज्यात नर्सिंग कॅडरची सुमारे १२ हजार पदं आहेत. सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग आणि नगरविकास विभागाच्या अखत्यारीत स्वतंत्र नर्सिंग कॅडर या तिन्ही विभागांची बैठक घेऊन नर्सिंग कॅडरमधल्या महिलांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि आवश्यक सुधारणा करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचं मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज सांगितलं.

या चर्चेत भाजपाच्या उमा खापरे यांनी राज्यातल्या परिचारिकांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधलं. राष्ट्रवादी काँग्रेसचे विक्रम काळे यांनी परिचर्या संचालनालयाची स्थापना अत्यावश्यक असल्याचं मत मांडलं. यावर आबिटकर यांनी स्वतंत्र संचालक नेमण्याचा प्रयत्न सुरू असल्याचं सांगितलं.

<><><><><>

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज विश्वनाथ पाटील चाकूरकर यांचं आज पहाटे लातूर इथं निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते.

पाटील यांनी लोकसभेच्या अध्यक्षपदासह केंद्र सरकारमध्ये अनेक महत्त्वाची पदे भूषवली होती. ते लातूर मतदारसंघातून सात वेळा लोकसभेवर निवडून गेले होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पाटील यांच्या निधनावर शोक व्यक्त केला. समाज माध्यमावरील संदेशात प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे की, पाटील हे एक अनुभवी नेते होते. ते समाजाच्या कल्याणासाठी योगदान देण्यास खूप उत्सुक होते.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवराज पाटील यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. पाटील हे महाराष्ट्राच्या राजकीय मूल्यांना जपणारे आणि त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर उंचावणारे एक प्रतिष्ठित आणि सुसंस्कृत नेते होते असं त्यांनी म्हटलं आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि माजी मुख्यमंत्री आणि खासदार अशोक चव्हाण यांनी पाटील यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. पाटील यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी ११ वाजता लातूर शहराजवळच्या वरवंटी इथं अंत्यसंस्कार करण्यात येतील.

<><><><><>

आंध्र प्रदेशातल्या अल्लुरी सीता रामाराजू जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या एका बस अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला तर २२ जण जखमी झाले. घटनास्थळी मदत आणि बचावकार्य सुरू असून जखमी प्रवाशांना सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तसंच आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या अपघाताविषयी शोक व्यक्त केला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांच्या  कुटुंबांना राष्ट्रीय मदत निधीतून दोन लाख रुपयांची तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

<><><><><>

चेन्नईमध्ये सुरु असलेल्या स्क्वॉश विश्वचषक २०२५ स्पर्धेच्या गट ब सामन्यात, भारतानं ब्राझीलवर ४-० असा दमदार विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. वेलावन सेंथिलकुमारनं पेड्रो मोमेट्टोवर ३-० नं मात करत विजयामध्ये योगदान दिलं. भारतानं यापूर्वी आपल्या पहिल्या सामन्यात स्वित्झर्लंडला ४-० असं हरवलं होतं.

स्क्वाश विश्वचषक २०२५ या स्पर्धेत चार गटांमध्ये १२ संघ खेळत असून, प्रत्येक गटातले अव्वल दोन संघ उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करतील. भारताचा पुढला सामना दक्षिण आफ्रिकेबरोबर होईल.

**<><><><>**

१९ वर्षांखालच्या आशियाई क्रिकेट स्पर्धा आजपासून दुबईमधे सुरु होत आहेत. भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्या पहिल्या सामन्यात संयुक्त अरब अमिरातीने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीसाठी पाचारण केलं आहे. या स्पर्धेत एकूण आठ संघ सहभागी झाले आहेत.

**<><><><>**

बांगलादेशचे अध्यक्ष मोहम्मद शहाबुद्दीन यांनी पुढल्या वर्षी १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर आपलं पद सोडण्याचा निर्णय जाहीर केला आहे. मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालच्या हंगामी सरकारमध्ये आपल्याला अपमानास्पद वागणूक मिळत असल्यामुळे हा निर्णय घेतल्याचं त्यांनी म्हटलं आहे. एका परदेशी वृत्तसंस्थेला समाजमाध्यमावर दिलेल्या मुलाखतीत त्यांनी केलेल्या या वक्तव्याचे बांगलादेशाच्या राजकीय विश्वात तीव्र पडसाद उमटत आहेत.

**<><><><>**

जपानमध्ये, आओमोरी प्रांताच्या पूर्व किनाऱ्यावर आज सकाळी ६ पूर्णांक ७ दशांश रिक्टर स्केल क्षमतेचा भूकंपाचा धक्का बसला. या भूकंपाचा केंद्रबिंदू केप एरिमो प्रांताच्या नैऋत्येला सुमारे १२० किलोमीटर अंतरावर भूगर्भात २० किलोमीटर खोलीवर होता. जपानच्या हवामान संस्थेनं भूकंपानंतर त्सुनामीचा इशारा दिला असून, समुद्रात मासेमारीसाठी किंवा नौकानयनासाठी गेलेल्यांनी ताबडतोब किनाऱ्यावर परतावं असे निर्देश दिले आहेत.

**<><><><>**

पाकिस्तानच्या उत्तर वझिरिस्तानमधल्या मीर अली इथल्या एका सरकारी शाळेत काल रात्री झालेल्या स्फोटात शाळा पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. अयाज कोट इथल्या शाळेत अज्ञात हल्लेखोरांनी स्फोटके पेरली होती. या स्फोटामुळे शाळेतले सर्व शैक्षणिक उपक्रम ठप्प झाले आहेत.

**<><><><><>**

युरोप मधल्या ऑस्ट्रिया या देशानं १४ वर्षांखालच्या मुलींनी शाळेत हिजाब किंवा बुरखा घालण्यावर बंदी घालणारा कायदा मंजूर केला आहे. हा नियम सर्व सरकारी आणि खासगी शाळांमध्ये लागू होणार आहे. तरुण मुलींना सक्षम बनवून त्यांना अत्याचारांपासून मुक्त ठेवण्यासाठी हा नियम अमलात आणल्याचं ऑस्ट्रिया सरकारनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र, छत्तीसगड, उत्तर कर्नाटक, ओदिशा, तेलंगणा आणि मध्य प्रदेशात आज थंडीची लाट राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे. उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, चंदीगड, दिल्ली आणि हिमाचल प्रदेशात काही ठिकाणी वातावरणात दाट धुकं राहील. ईशान्य भारतात आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोरम, आणि त्रिपुरा मध्येही अशीच परिस्थिती राहील असा अंदाज आहे.

अंदमान आणि निकोबार द्वीप समूहांवर आज मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, यावेळी सोसाट्याचे वारे वाहतील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

दरम्यान, दिल्ली परिसरात हवेची गुणवत्ता अत्यंत वाईट श्रेणीत असून, आज सकाळी हवेचा सरासरी गुणवत्ता निर्देशांक ३२९ इतका नोंदवला गेला.

**//<><><><><>//**